चौदाव्या वित्त आयोगाच्या निधीतून कोरोना विषाणूचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक तसेच नियंत्रणात्मक उपाययोजना करणेबबात.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन परिपत्रक क्रमांक-चौविआ-२०२०/प्रक्र-३८ /वित्त-४
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दि. ३१ मार्च, २०२०

वाचा: १. शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र.जीपीडीपी-२०१५/ प्र.क्र.३८/पं.रा.-६ , दि.०४ नोव्हेंबर, २०१५.
२. शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र.चौविआ-२०१५/ प्र.क्र.२६ /वित्त-४, दि. २१ डीसेंबर, २०१५.
३ शासन अधिसूचना, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.कोरोना-२०२०/ प्र.क्र.५८/आरोग्य-५ दि. १४ मार्च, २०२०
४.अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग यांचे दि.१३ मार्च २०२० व २४ मार्च २०२० चे अर्धशासकीय पत्र.

**शासन परिपत्रक:-**

राज्यात कोरोना विषाणूमुळे (COVID-19) उदभवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक तसेच नियंत्रणासाठी संदर्भिय दिनांक.१४ मार्च, २०२० च्या शासन अधिसूचना अन्वये सार्वजनिक आरोग्य विभागाने "महाराष्ट्र कोव्हीड-१९ उपाय योजना नियम २०२०" अधिसूचित केले आहे.

राज्यामध्ये झालेला कोरोना विषाणुचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थानी प्रतिबंधात्मक उपाययोजना तात्काळ गरणे गरजेचे आहे. याबाबत विविध उपाययोजना जिल्हा स्तरावर व ग्रामपंचायत स्तरावर करण्यात येत आहेत. विविध उपायोजना करण्यासाठी ग्रामपंचायत पातळीवर वित्त आयोगाच्या शिल्लक निधीतून खर्च करण्यात याव्यात अशा सूचना यापूर्वीच दिलेल्या आहेत.

१४ व्या वित्त आयोगांतर्गत ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थाना उपलब्ध होणा-या निधीपैकी २५% निधी मानव विकास निर्देशांक वृध्दी संबंधित कामासाठी वापरणे बंधनकारक करण्यात आले आहे. ज्यामध्ये शिक्षण, आरोग्य, उपजीविका याबाबी आणि इ. घटकांचा समावेश होतो. त्या अनुषंगाने ग्रामीणस्थानिक संस्थाव्दारे १४ व्या वित्त आयोगाचा निधी राखीव ठेवण्यात आला आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाने अधिसुचित केलेल्या उपाययोजनांच्या अनुषंगाने ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थाना म्हणजेच राज्यातील सर्व ग्रामपंचायतीना १४ व्या वित्त आयोगाच्या निधीचा वापर करता येईल.

कोरोना विषाणूचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी तसेच त्याच्या नियंत्रणासाठी करावयाच्या उपाययोजनांवर १४ वित्त आयोग निधीचा वापर २५% च्या मर्यादेत सर्व ग्रामपंचायतीव्दारे करण्यात यावा. या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी ( सर्व जिल्हा परिषद ) यांनी उपरोक्त निर्देशांप्रमाणे १४ व्या वित्त आयोगाच्या निधीचा विनियोग कोरोना संबंधित उपाययोजनांवर करण्यासाठी आपल्या अखत्यारीतील सर्व ग्रामपंचायतीचा आढावा घेऊन आपल्या स्तरावरूनही सूचना देण्यात याव्यात.

Scanned with CamScanner

वित्त आयोगातून घेण्यात येणाऱ्या कामाच्या आराखडयांना (चालू वर्षाचे व पुढील वर्षाचे )यापूर्वीच ग्रामसभेद्वारे अंतिम मान्यता देण्यात आलेल्या आहेत.त्यात बदल करावयाचे झाल्यास शासन निर्णयाप्रमाणे ग्रामसभेचा ठरावाद्वारे व तांत्रिक समितीच्या छाननीनंतर बदलाचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर करण्यात येईल व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मान्यता दिल्यानंतर सदर आराखडयात बदल करण्यात येईल अशा मार्गदर्शक सूचना शासन निर्णय जीपीडीपी-२०१५/ प्र.क्र. ३८/ पंरा.६ दिनांक ४ नोव्हेंबर. २०१५ अन्वये देण्यात आलेल्या आहेत.

सध्यस्थितीत कोरोना मुळे ग्रामसभा घेता येणे शक्य नाही, त्यामुळे कोरोना विषयी प्रतिबंधात्मक व इतर उपाययोजना करावयाच्या कामाचा समावेश आराखडयामध्ये करावयासाठी ग्रामपंचायतीनी त्यांच्या स्तरावर आराखडयात (ग्रामसभेच्या मान्यतेच्याअधिन राहून) तालुका तांत्रिक समितीची मंजूरी घ्यावी, व सर्व उपाययोजना कराव्यात. तदनंतर सध्याची परिस्थिती बदल झाल्यानंतर आराखडयास ग्रामसभेची कार्योत्तर मान्यता घेवून मुख्य कार्यकारी अधिकारी यांची कार्योत्तर मान्यता घेणेत यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Pravin Jain

(प्रविण जैन)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

२) सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जिल्हा परिषद,

३) सर्व मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद,

Scanned with CamScanner